अपील अधिकारी तथा सामान्य प्रशासन विभाग
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
शिवाजीनगर पुणे ४११००५
दूरध्वनी क्र. ०२०-२५५०११२३
ई मेल aadmcgeneral@punecorporation.org
अपील क्र.११/२०२४
जा.क्र उआ(सा.प्र.)/ आस्था/१३१२७दि.०७/३/२०२४

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त ,
सामान्य प्रशासन विभाग, पुणे महानगरपालिका
अपील क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा.उआ(सा.प्र.)/अपिल/११/२०२४

श्री.अविनाश रामचंद्र रिठे,
रा.रिठे हाऊस, डावखरे बिल्डिंग जाधववस्ती
कळसगाव, आळंदी मार्ग, पुणे-४११०१५
भ्रमणध्वनी क्र.९२१०४९५०९

---------------- अपिलार्थी

विरुद्ध
**जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी**
आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका

---------------- प्रतिवादी

## आदेश

### प्रस्तावना :-

श्री.अविनाश रामचंद्र रिठे, रा.रिठे हाऊस, डावखरे बिल्डिंग जाधववस्ती, कळसगाव, आळंदी मार्ग, पुणे-४११०१५ (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांनी दि.३०/१२/२०२३ रोजी नगर विकास विभागाकडे केला. नगर विकास विभागाने दि.१८/१/२०२४ रोजी पुणे मनपाकडे वर्ग केला. स्वागत कक्षाकडे दि.२९/१/२४ रोजी प्राप्त (स्वागत कक्ष आ.क्र.१२१७२ दि.२९/०१/२०२४) झाला. महापालिका आयुक्त कार्या. जा.क्र.स्वागत/१२०४७ दि.३१/१/२०२४ रोजी सामान्य प्रशासन विभागास वर्ग करण्यात आला आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जावरील दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचा दि. | माहिती द्यावयाचा अंतिम दि. | अपिलार्थीस उत्तर/माहिती पाठविल्याचा दि. | विलंब दिवस |
| ३०/१२/२०२३ | स्वागत कक्षाकडून प्राप्त दि.३१/१/२०२४ | ०१/०३/२०२४ | ०९/०२/२०२४ | ० |

अपिलार्थी यांनी अर्ज पुणे मनपा यास वर्ग पुणे मनपातील नगरसचिव पदासाठी प्रतिनियुक्ती वर शासन अधिकारी नियुक्तीबाबत निवेदन देण्यात आले होते सदर निवेदनवरील कारवाईचा तपशील", असे नमूद करुन स्वागत कक्ष यांचेकडे आ.क्र.१२४९३ दि.०५/२/२०२४ रोजी अपिल अर्ज दाखल केला आहे. अपिल अर्ज जा.क्र.१२४२१ दि.७/२/२०२४ रोजी (आ.क्र.१९१५९ दि.७/२/२०२४) रोजी अर्ज प्राप्त झाला आहे.

| अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अपील अर्जाचा दिनांक | अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दि. | अपील दाखल करावयाचा अंतिम दि. | अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | अपील अर्जाच्या विलंब बाबत निवेदन दिले आहे का? |
| ०५/०२/२०२४ | ०७/०२/२०२४ | ०९/०३/२०२४ | होय | लागू नाही |

प्रस्तुत प्रकरणी माहिती अधिकार मूळ अर्जास उत्तर देण्यापूर्वी अपिल अर्ज दाखल करण्यात आलेला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन), पुणे महानगरपालिका यांनी जा.क्र.उआ (सा.प्र.)/आस्था/१२४७१, दि.१६/२/२०२३ रोजी सुनावणी दिनांक २६/०२/२०२४ रोजी दुपारी १२.३० वा. ऑनलाईन आयोजित करण्यात आली असल्याचे कळविण्यात आले आहे. त्यानुसार सुनावणी दि.२६/२/२०२४ रोजी दुपारी १२.३० वा. ऑनलाईन सुनावणी घेण्यात आली. सुनावणी दरम्यान तांत्रिक कारणामुळे वारंवार अपिलार्थी यांचेकडून प्रश्न उद्धवण्यात आल्याने लेखी म्हणणे कळविणेबाबत दि.२६/२/२०२४ रोजी ईमेलद्वारे कळविण्यात आले. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग सुनावणीस उपस्थित होते.

## युक्तिवाद:-

अपिलार्थी यांनी सुनावणी दरम्यान केलेल्या तोंडी व लेखी युक्तिवादातील महत्वाचे मुद्दे खालीलप्रमाणे आहेत.

१. दि.९/२/२०२४ च्या पत्राद्वारे पाठविलेली माहिती मी मागणी केल्याप्रमाणे नाही, असे तोंडी कथन केले. अपिलकर्ता यांचेकडील Network weak असल्याने (नेटवर्क क्षीण) वारंवार संपर्क तुटला. यास्तव त्यांना लेखी म्हणणे ईमेलद्वार पाठविणेबाबत कळविण्यात आले.

२. <u>ईमेलद्वारे प्राप्त अपिलार्थी यांचा खालीलप्रमाणे खुलासा प्राप्त</u>
पुणे महानगरपालिका मधील नगर सचिव पद हे तुपुरस्सर रिक्त ठेवण्यात येत आहे, नगर सचिव पद भरतीसाठी जाहिरात दिल्यानंतर ४२ उमेदवारांनी अर्ज केले होते, त्यामधून २९ उमेदवारांची निवड करुन त्यांना मुलाखती ची संधी दिली व मुलाखत घेतल्या पण २९ उमेदवारामधी एक हि योग्य उमेदवार भेटला नाही ? हा संशोधनाचा व चौकशी चा विषय आहे.
महापालिका मधील सेवाज्येष्ठता व शैक्षणिक योग्यता पाहून सेवारत अधिकारी यांची नियुक्ती करण्यात काय अडचण आहे, महापालिका अधिकारी यांची नगर सचिव पदावर नियुक्ती नको असेल तर शासन अधिकारी प्रतिनियुक्तीवर घेण्यात काय अडचण आहे, यामुळे मा. नगर विकास मंत्री साहेब यांना दिनांक - २२/०६/२०२३ रोजी निवेदन देण्यात आले होते संबंधित निवेदनाचे

अवलोकन अपील प्राधिकारी यांनी करावे.

३. माहितीचा अधिकार अन्वये दिनांक - ३०/१२/२०२३ रोजी मा. नगर विकास मंत्री यांचे कार्यालय मधील अर्ज दाखल केला होता,

४. मा. नगर विकास मंत्री यांचे कार्यालय कडून माहितीचा अधिकार अन्वये अर्ज पुणे महानगरपालिका यांना दिनांक - १८/०१/२०२४ रोजी वर्ग करण्यात आला आहे,

५. पुणे महानगरपालिका कडून माहिती देण्यात आली नाही,

६. दिनांक - ०३/०२/२०२४ रोजी मा. अपील प्राधिकारी, महापालिका आयुक्त कार्यालय, यांना अपील दाखल केले होते,

७. दिनांक - ३/२/२०२४ रोजी दाखल अपील वर उपआयुक्त सामान्य प्रशासन विभाग तथा अपील प्राधिकारी यांनी सुनावणी आयोजित केली होती परंतु नेटवर्क मुळे सुनावणी व्यवस्थीत पार पडली नाही, वरील १ ते ५ अनुक्रमांक नुसार अपीलार्थी यांनी त्यांचे म्हणणे सादर केले आहे.

<u>जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग यांच्या युक्तिवादात खालील मुद्दे उपस्थित केले</u>

१. जन माहिती अधिकारी यांनी दि.९/२/२०२४ रोजीच्या पत्राने माहिती पुरविली असल्याचे सांगितले व त्यानुसार नगरसचिव पद पदोन्नती/पदनिर्देशनाने भरले जाते. प्रतिनियुक्तीने भरले जात नाही, याबद्दल नियमावली पुरविली असल्याचे कथन केले.

## <u>विवेचन:-</u>

अपिलार्थी यांचा मूळ अर्ज, अपिल अर्ज व सुनावणी दरम्यान तोंडी व ईमेलद्वारे लेखी युक्तिवाद व दिलेले उत्तर अभ्यासले आहे. त्यानुसार खालील बाबी निदर्शनास येतात.

१. अपिलार्थी यांनी मूळ अर्ज दि.३०/१२/२०२३ रोजी नगर विकास विभागाकडे केला. नगर विकास विभागाने दि.१८/१/२०२४ रोजी पुणे मनपाकडे वर्ग केला. स्वागत कक्षाकडे दि.२९/१/२४ रोजी प्राप्त (स्वागत कक्ष आ.क्र.१२१७२ दि.२९/०१/२०२४) झाला. महापालिका आयुक्त कार्या. जा.क्र.स्वागत/१२०४७ दि.३१/१/२०२४ रोजी सामान्य प्रशासन विभागास वर्ग करण्यात आला आहे.

२. अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांनी दि.९/२/२०२४ रोजीच्या पत्राने दिलेले उत्तर प्राप्त झाले नसल्याचे कथन केले व पुणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील नगरसचिव हे पद प्रतिनियुक्तीने भरणेबाबत मुद्दा उपस्थित केला. त्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराचे अवलोकन करणे क्रमप्राप्त ठरते ते खालीलप्रमाणे.

"पुणे महानगरपालिकेच्या शासनमान्य सेवा (सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०१४ अन्वये नगरसचिव हे पद प्रतिनियुक्तीचे नसून हे पद नामनिर्देशिन व पदोन्नतीने भरण्यात येते (सोबत प्रत जोडत आहे-३ पाने)"

३. सदर उत्तराचे अवलोकन केले असता नगरसचिव हे पद प्रतिनियुक्तीने भरणेची तरतूद नाही. पुणे

महानगरपालिका सेवा (सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०१४" मध्ये सदर पद नामनिर्देशन व पदोन्नतीने भरणेबाबत तरतूद आहे. जन माहिती अधिकारी यांनी नियमावली व तद्नुषंगिक माहिती पुरविली आहे व सदरची माहिती स्पिडपोस्टद्वारे कळविली आहे. त्यामुळे माहिती पुरविली नाही असा निष्कर्ष काढता येत नाही. यावर अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही असे कथन केल्याने जन माहिती अधिकारी यांनी सदरची माहिती ईमेलद्वारे देणे उचित आहे.

वरील विवेचनावरुन मी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन), पुणे महानगरपालिका खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१) अपिल अर्ज अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी सदरची माहिती पुन:श्च ईमेलद्वारे द्यावी.

३) सदर आदेशाने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ते या आदेशाविरुद्ध मा.राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, ४ मजला विधानभवन समोर, पुणे यांजकडे ९० दिवसांपर्यंत कालावधीत द्वितीय अपिल दाखल करु शकतात.

४) निकाल सर्व संबंधितांना तात्काळ ईमेलद्वारे कळविण्यात यावा.

दिनांक- /०३/२०२४

(महेश पाटील)
प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका